MASTER COPY

| Question Booklet Series प्रश्नपुस्तिका मालिका | Question Paper Code प्रश्नपत्रिका कोड | Question Booklet No. प्रश्नपुस्तिका क्र. |
|---|---|---|
| **M** | **16** | |

Roll No. : / रोल नं. : ____________________

Name of the Candidate : / उमेदवाराचे नाव : ____________________

| *Test Duration : 90 Minutes* | *Total No. of Questions : 100* | *Total Marks : 100* |
|---|---|---|
| *चाचणीचा कालावधी : 90 मिनिटे* | *प्रश्नांची एकूण संख्या : 100* | *एकूण गुण : 100* |

## INSTRUCTIONS TO THE CANDIDATES : / उमेदवारासाठी सूचना :

THE CANDIDATES MUST READ THESE INSTRUCTIONS CAREFULLY BEFORE ATTEMPTING THE QUESTIONS IN THE QUESTION BOOKLET.

प्रश्नपुस्तिकेतील प्रश्न सोडवण्यापूर्वी उमेदवाराने या सूचना काळजीपूर्वक वाचल्या पाहिजेत.

1. Mark carefully your Roll Number, Question Paper Code, Question Booklet Number and Question Booklet Series on the OMR Answer Sheet and signature at the appropriate place. Write your Roll Number and **Name on the Question Booklet**. In the absence of Roll Number, Question Booklet Number and Question Booklet Series on the OMR Answer Sheet, it may NOT be evaluated and it may be cancelled.
   ओएमआर वर तुमचा रोल नंबर, प्रश्नपत्रिका कोड, प्रश्नपुस्तिका क्रमांक आणि प्रश्नपुस्तिका मालिका काळजीपूर्वक लिहा आणि योग्य ठिकाणी स्वाक्षरी करा. प्रश्नपुस्तिकेत तुमचा रोल नंबर आणि नाव लिहा. ओएमआर उत्तरपत्रिकेवर रोल नंबर, प्रश्नपुस्तिका क्रमांक आणि प्रश्नपुस्तिका मालिका नसल्यास त्याचे मुल्यांकन होणार नाही आणि ते रद्द ठरवले जाऊ शकते.
2. The entire Test is of Objective Type Questions comprising of **100** questions. All questions are mandatory.
   संपूर्ण चाचणी वस्तुनिष्ठ प्रकारच्या प्रश्नांची असून, त्यात **100** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
   **Each question carries One Mark. There is No Negative Marking for any wrong answer. Questions are in Marathi language only.**
   **प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. यात कोणत्याही चुकीच्या उत्तरासाठी निगेटिव्ह मार्किंग नाही. प्रश्न फक्त मराठी भाषेत आहेत.**
3. The candidate must check that the Question Booklet contains 100 multiple choice questions in **12** pages. If any discrepancy is found, report to the invigilator immediately.
   उमेदवाराने त्या प्रश्नपुस्तिकेत **12** पानांमध्ये 100 बहुपर्यायी प्रश्न असल्याचे तपासून घेतले पाहिजेत. कोणतीही विसंगती आढळल्यास, पर्यवेक्षकाला त्वरित कळवा.
4. Chosen options are to be indicated only on the OMR Answer Sheet, as per instructions given on the OMR Answer Sheet, taken care to enter the answer in prescribed manner in the space provided in the OMR Answer Sheet for the concerned question number (as given in the Question Booklet).
   संबंधित प्रश्न क्रमांकासाठी ओएमआर उत्तरपत्रिकेत दिलेल्या जागेत विहित पध्दतीने उत्तर लिहिण्याची काळजी घेत, ओएमआर उत्तरपत्रिकेवर दिलेल्या सूचनांच्या अनुसार निवडलेले पर्याय फक्त ओएमआर उत्तरपत्रिकेवर सूचित करायचे असतील (दिलेल्या प्रश्नपुस्तिके नुसार).
5. The candidate must use a **BLUE/BLACK** ball point pen ONLY to make entries on the OMR Answer Sheet.
   उमेदवाराने ओएमआर उत्तरपत्रिकेवर प्रविष्टी करताना फक्त **निळे/काळे** बॉल पॉइंट पेनच वापरले पाहिजे.
6. Rough work may be done on the space provided in this Question Booklet, but not on the OMR Answer Sheet.
   कच्चे काम ओएमआर उत्तरपत्रिकेवर न करता प्रश्नपुस्तिकेत दिलेल्या जागेतच केले पाहिजे.
7. At the end of the Test, the candidate must submit the OMR Answer Sheet and Question Booklet to the invigilator on duty.
   चाचणीच्या अखेरीस, उमेदवाराने ओएमआर उत्तरपत्रिका आणि प्रश्नपुस्तिका ड्युटीवर असलेल्या पर्यवेक्षकाला सोपवली पाहिजे.

PLEASE REFER THE BACKSIDE OF THE QUESTION BOOKLET FOR MORE INSTRUCTIONS.

**अधिक सूचनांसाठी, कृपया प्रश्न पुस्तिकेच्या मागील बाजूचा संदर्भ घ्या.**

www.freshersnow.com

FRESHERS NOW



1. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे गृहमंत्री कोण आहेत ?
   (A) जयंत पाटील
   (B) हर्षवर्धन पाटील
   (C) दिलीप वळसे पाटील
   (D) यापैकी नाही

2. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे पोलीस महासंचालक कोण आहेत ?
   (A) संजय पांडे (B) प्रवीण दीक्षित
   (C) सतीश माथुर (D) हेमंत नगराळे

3. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे पर्यटन कॅबिनेट मंत्री कोण आहेत ?
   (A) नवाब मलिक (B) यशोमती ठाकूर
   (C) आदित्य ठाकरे (D) राजेश टोपे

4. 2021 च्या ऑलिंपिक स्पर्धेत भारतातर्फे खालीलपैकी कोणी पदक जिंकले नाही ?
   (A) मीराबाई चानू
   (B) पी.व्ही. सिंधू
   (C) नीरज पांडे
   (D) रवी कुमार दहिया

5. आर.बी.आय. चे मुख्यालय कोठे आहे ?
   (A) दिल्ली (B) नागपूर
   (C) नवी मुंबई (D) मुंबई

6. खालीलपैकी कोणते ठिकाण नागपूर जिल्ह्यात नाही ?
   (A) कामठी (B) बल्लारपूर
   (C) रामटेक (D) हिंगणा

7. राज्यसभा दर किती वर्षांनी बरखास्त करण्यात येते ?
   (A) 5 (B) 6
   (C) 2 (D) कधीच नाही

8. महाराष्ट्र राज्याचे राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे दोन युनिट कोठे आहे ?
   (A) महाळ व पुणे (B) नागपूर व धुळे
   (C) कोल्हापूर व पुणे (D) नागपूर व पुणे

9. कोणता औष्णिक विद्युत प्रकल्प नागपूर जिल्ह्यात नाही?
   (A) कापरखेडा (B) पारस
   (C) मौदा (D) कोराडी

10. भारताचे 48 वे सरन्यायाधीश कोण आहेत ?
   (A) न्या. रंजन गोगाई
   (B) न्या. शरद बोबडे
   (C) न्या. एन.व्ही. रामण्णा
   (D) न्या. वाय. चंद्रचूड

11. 2020 सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार कोणाला दिला गेला ?
   (A) आशा भोसले
   (B) लता मंगेशकर
   (C) सचिन तेंडुलकर
   (D) बाबासाहेब पुरंदरे

www.freshersnow.com

12. कोरोना विषाणूच्या चाचणी साठी वापरली जाणारी आरटी–पीसीआर चाचणी म्हणजे काय ?
 (A) रिवर्स ट्रान्सक्रिप्शन – पॉलीमरेस चैन रिएक्शन
 (B) रिवर्स ट्रान्सफॉरमिंग – पॉलीमरेस चैन रिएक्शन
 (C) रिवर्स ट्रान्सक्रिप्शन – पोलिटिकल चैन रिएक्शन
 (D) रिवर्स ट्रान्सक्रिप्शन – पॉलीमरेस चेस्ट रिप्लेसर

13. सध्याच्या परीसिमन आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत ?
 (A) न्या. धर्माधिकारी
 (B) न्या. शरद बोबडे
 (C) न्या. रंजन गोगाई
 (D) न्या. रंजना देसाई

14. भारतातील कोणत्या राज्य सरकारने त्यांच्या राज्यातील विधानपरिषद बरखास्त करण्याच्या निर्णयाला मंजुरी दिली ?
 (A) महाराष्ट्र (B) आंध्र प्रदेश
 (C) बिहार (D) कर्नाटक

15. 2021 मध्ये ऑलिंपिक स्पर्धा कोठे आयोजित करण्यात आल्या ?
 (A) बीजिंग (B) रोम
 (C) टोकियो (D) रिओ

16. 15 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत ?
 (A) एन.के. सिंग (B) वाय.व्ही. रेड्डी
 (C) सी. रंगराजन (D) विजय केळकर

17. पेंच राष्ट्रीय उद्यानास कोणते नाव देण्यात आले आहे ?
 (A) इंदिरा गांधी राष्ट्रीय उद्यान
 (B) राजीव गांधी राष्ट्रीय उद्यान
 (C) पंडीत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय उद्यान
 (D) महात्मा गांधी राष्ट्रीय उद्यान

18. दुसरी गोलमेज परिषद ________ साली भरली.
 (A) 1930 (B) 1931
 (C) 1933 (D) 1934

19. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्वप्रथम कोणता किल्ला जिंकला ?
 (A) सिंहगड (B) रायगड
 (C) तोरणा (D) राजगड

20. उपराष्ट्रपती हे ________ चे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
 (A) लोकसभा (B) विधानसभा
 (C) विधानपरिषद (D) राज्यसभा

21. अमरावती येथे शिवाजी शिक्षण संस्था, श्रद्धानंद छत्रालायची स्थापना कोणी केली ?
 (A) बाबा आमटे
 (B) डॉ. सुनिल देशमुख
 (C) डॉ. पंजाबराव देशमुख
 (D) डॉ. शिवाजी पटवर्धन

22. राज्य राखीव पोलीस दलाचे मुख्यालय कोठे आहे ?
 (A) पुणे (B) नागपूर
 (C) नवी मुंबई (D) यापैकी नाही

www.freshersnow.com

23. खालीलपैकी कोणत्या वायूमुळे पृथ्वीचे वातावरण उबदार आहे ?

(A) ओझोन

(B) प्राणवायू

(C) कार्बन डायऑक्साइड

(D) कार्बन मोनोऑक्साइड

24. महात्मा ज्योतीबा फुले यांचा जन्म कधी झाला ?

(A) 11 एप्रिल 1827 (B) 11 एप्रिल 1828

(C) 18 एप्रिल 1827 (D) 18 एप्रिल 1828

25. व्ही. कुरियन हे नाव खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?

(A) आर्थिक धोरण (B) हरित क्रांती

(C) शैक्षणिक धोरण (D) धवल क्रांती

26. खालीलपैकी हात या शब्दाचा समानार्थी शब्द नाही.

(A) कर (B) पाणि

(C) पद (D) हस्त

27. खालीलपैकी सायास या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द आहे ?

(A) विनासायास (B) विनायास

(C) अस्त (D) सनातनी

28. अनुनासिक नसणारे व्यंजन ओळखा.

(A) ड् (B) न्

(C) म् (D) ण

29. संयुक्त नसणारा स्वर ओळखा.

(A) ए (B) औ

(C) इ (D) ओ

30. गिरि + ईश

(A) गिरिश (B) गीरईश

(C) गिरीश (D) गिर्रश

31. पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

पंकज लांब दोरी आणायला गेला.

पंकज दोरी आणायला लांब गेला.

(A) विशेषण, क्रियाविशेषण

(B) क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय

(C) नाम, नाम

(D) नाम, विशेषण

32. लिंग बदला : बोका

(A) बोकी (B) बोकिळ

(C) भाटी (D) यापैकी नाही

33. लिंग ओळखा – सोने

(A) नपुंसकलिंग (B) पुल्लिंग

(C) स्त्रीलिंग (D) यापैकी नाही

34. सुखद या शब्दाचा विग्रह करा.

(A) सुखांतक (B) दुखी नसणारे

(C) सुखी (D) सुख देणारे

35. ऊठ शब्दापासून अभ्यस्त शब्द बनवा.

(A) उठणे (B) ऊठसुठ

(C) उठला (D) ऊठऊठ



www.freshersnow.com

36. खालीलपैकी कोणते वाक्य कर्तरी प्रयोगाचे आहे ?
(A) तिला आंबट दही खाववते.
(B) त्याला खारीक चाववते.
(C) राम ने आंबा खाल्ले.
(D) तो आंबा खातो.

37. मनुष्य या शब्दाचे भाववाचक नाम कोणते ?
(A) मानव (B) माणूस
(C) मनुष्यत्व (D) मानवी

38. वधू या शब्दाचे अनेकवचनी रूप लिहा.
(A) वधू (B) विधवा
(C) वधवा (D) वधुरी

39. सामान्य सर्वनाम असलेले वाक्य कोणते ?
(A) कोणी यावे, कोणी जावे.
(B) हा रबरी चेंडू आहे.
(C) कोणी बक्षीस मिळवले ?
(D) कोण आहे तिकडे ?

40. पुढील शब्दापासून विशेषण तयार करा – शास्त्र
(A) शास्त्रार्थ (B) शास्त्री
(C) शास्त्रीय (D) शास्त्रज्ञ

41. शामा चित्र काढत राहील. या वाक्याचा काळ ओळखा.
(A) रीति भविष्यकाळ
(B) साधा भविष्यकाळ
(C) पूर्ण भविष्यकाळ
(D) साधा वर्तमानकाळ

42. पुढीलपैकी कालवाचक क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा.
(A) गतिदर्शक (B) निश्चयदर्शक
(C) आवृत्तीदर्शक (D) यापैकी नाही

43. अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.
तू पण माझ्या बरोबर प्रार्थना म्हण
(A) उभयान्वयी अव्यय
(B) शब्दयोगी अव्यय
(C) क्रियाविशेषण
(D) केवलप्रयोगी अव्यय

44. अबब ! हा शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारचा आहे ?
(A) केवलप्रयोगी अव्यय
(B) विशेषण
(C) उभयान्वयी अव्यय
(D) क्रियापद

45. तू काही आता लहान नाहीस – या साठी होकारार्थी पर्याय निवडा.
(A) तू केव्हा मोठा होणार आहेस ?
(B) तू आता लहान उरला नाहीस.
(C) तू आता मोठा झाला आहेस.
(D) मोठा हो जरा, आता तरी!

46. लक्ष्मीकांत या सामासिक शब्दाचा विग्रह करा.
(A) लक्ष्मीचा पती
(B) लक्ष्मी आहे कांता ज्याची तो
(C) लक्ष्मीचा कांत
(D) लक्ष्मी + कांत

www.freshersnow.com

47. शुद्धलेखनाच्या नियमाप्रमाणे योग्य शब्द कोणता ?
(A) माहिति (B) माहिती
(C) माहीती (D) माहीति

48. शुद्धलेखनाच्या नियमाप्रमाणे योग्य शब्द कोणता ?
(A) आशीर्वाद (B) आशिर्वाद
(C) अंशीर्वाद (D) आशीर्व्रद

49. खालील शब्द समूहासाठी योग्य शब्द निवडा.
अधांतरी लोंबकळणारा
(A) स्वर्ग (B) आकाश
(C) अंतराळ (D) त्रिशंकू

50. नाचता येईना आंगण वाकडे
(A) कोल्हा काकडीला राजी
(B) कोल्ह्याला द्राक्षे आंबट
(C) चोराच्या उलट्या बोंबा
(D) चोराच्या मनात चांदणे

51. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.
1, 8, 9, __, 25, 216, 49
(A) 64 (B) 16
(C) 27 (D) 125

52. पुढील मालिकेतील चुकीचे पद ओळखा.
ACBD, EGFH, IKJL, MONP, PQRS
(A) EGFH (B) IKJL
(C) PQRS (D) MONP

53. खालीलपैकी कोणती जोडी DRIVE चा IREDV शी असलेला संबंध दर्शविते.
(A) LOWER : WORLE
(B) AMONG : OMNAG
(C) WORDS : OSWDR
(D) STRAY : TRASY

54. विसंगत पर्याय ओळखा.
(A) रेडियम (B) पोलोनिअम
(C) थोरियम (D) सोडियम

55. विसंगत पर्याय ओळखा.
(A) 11 (B) 13
(C) 15 (D) 17

56. जर AURANGABAD = EYVERKEFEH
तर NAGPUR = ?
(A) RTEKYV (B) RETKYV
(C) RKETYV (D) REKTYV

57. जर पांढऱ्याला निळा म्हटले, निळ्याला लाल म्हटले, लालला पिवळा म्हटले, पिवळ्याला हिरवा म्हटले, हिरव्याला काळा म्हटले, काळ्याला जांभळा म्हटले तर मानवी रक्ताचा रंग कोणता ?
(A) लाल (B) हिरवा
(C) पिवळा (D) जांभळा

58. एका निवडणूकीत 8% मतदारांनी मतदान केले नाही. या निवडणूकीत फक्त दोनच उमेदवार होते. निवडून आलेल्या उमेदवारास एकूण मतांच्या 48% मते मिळून त्याने 1100 मतांनी दुसऱ्या उमेदवाराचा पराभव केला. तर निवडणूकीत एकूण मतदार किती होते ?
(A) 21000 (B) 23500
(C) 22000 (D) 27500

www.freshersnow.com

FRESHERS NOW



**59.** A हा B पेक्षा कमी धावतो आणि B हा C च्या वेगाएवढ्या वेगाने परंतु C पेक्षा जास्त वेगाने नव्हे, धावत असेल; तर A शी तुलना करता C कसा धावतो ?

(A) A पेक्षा कमी वेगाने

(B) A पेक्षा जलद

(C) A च्या वेगाएवढ्या वेगाने

(D) दिलेली माहिती अपुरी आहे

**60.** पाच मुली रांगेत अशा बसल्या आहेत की रिता ही उजव्या बाजूस आहे. रिता नंतर सीता तीच्या डाव्या बाजूस आहे. गीता ही लिनाच्या डाव्या बाजूस आहे. मीना ही लिनाच्या डाव्या बाजूस परंतु गीताच्या उजव्या बाजूस आहे. तर मध्यभागी कोण बसले आहे ?

(A) लिना (B) मीना

(C) गीता (D) सीता

**61.** मी पुरुष आहे. सुनील चा मुलगा माझ्या मुलाचे वडील आहे. सुनील हा __________.

(A) माझा भाऊ (B) माझे वडील

(C) माझे आजोबा (D) मी स्वत:

**62.** अनिल हा सुनिता पेक्षा दुप्पट वयाचा आहे. तीन वर्षापूर्वी, त्याचे वय सुनिताच्या तेव्हाच्या वयाच्या तिप्पट होते. तर अनिलचे सध्याचे वय किती ?

(A) 6 वर्ष (B) 8 वर्ष

(C) 12 वर्ष (D) 16 वर्ष

**63.** घड्याळीत दुपारी 3 वाजून 30 मिनिटे झाली असता तास काटा व मिनीट काटा यांच्या मध्ये किती अंशाचा कोन होईल ?

(A) 75° (B) 65°

(C) 95° (D) 105°

**64.** 5, 2 व 9 या पैकी प्रत्येक अंक एकदाच वापरुन तयार होणारी सर्वात मोठी संख्या व सर्वात लहान संख्या यातील फरक सांगा.

(A) 646 (B) 656

(C) 952 (D) 693

**65.** एका प्राणी संग्रहालयात मोर व हरणे यांची एकूण संख्या 50 असून त्यांच्या पायांची संख्या 144 आहे तर त्यापैकी मोर व हरणे यांची संख्या अनुक्रमे किती ?

(A) 30, 20 (B) 32, 18

(C) 26, 24 (D) 28, 22

**66.** विसंगत घटक ओळखा.

(A) मथूरा (B) वाराणसी

(C) नागपुर (D) हरिद्वार

**67.** जर A च्या ऐवजी E, B च्या ऐवजी F, C च्या ऐवजी G, याच प्रमाणे अक्षरे वापरली तर या संकेतात HARMONY हा शब्द कसा लिहीला जाईल ?

(A) KEVQRSU (B) KUVQSRU

(C) LEVQSRC (D) LEUPRQC

**68.** एका सांकेतिक भाषेत जर BACK हा शब्द 4-2-6-22 असा लिहिला तर SUPERMAN हा शब्द कसा लिहावा ?

(A) 19-21-16-5-18-13-1-14

(B) 38-42-32-10-26-36-2-28

(C) 38-42-32-10-26-26-2-28

(D) 38-42-32-10-36-26-2-28

www.freshersnow.com

**69.** 28, 74, 32, 70, 36, 66, 40, ?, 44

योग्य उत्तर निवडा.

(A) 62 (B) 64

(C) 60 (D) 68

**70.** 1992 चा प्रजासत्ताक दिन सोमवारी होता तर त्या वर्षीचा स्वतंत्रता दिवस कोणत्या दिवशी येईल ?

(A) सोमवार (B) रविवार

(C) शनिवार (D) मंगळवार

**71.** 20000 या संख्येशी जुळणारा पर्याय कोणता ?

(A) 40 गुणिले 50

(B) 400 गुणिले 500

(C) 40 गुणिले 500

(D) 250 गुणिले 40

**72.** 54 ते 60 या क्रमवार संख्येची सरासरी किती येईल ?

(A) 57 (B) 56.5

(C) 57.5 (D) 58

**73.** 500 रुपये मुद्दलाची द.सा.द.शे. 10 रुपये सरळ व्याजाने दामदुप्पट होण्यास किती वर्ष लागतील ?

(A) 5 वर्ष (B) 20 वर्ष

(C) 10 वर्ष (D) 15 वर्ष

**74.** 12 सें.मी. बाजू असलेल्या चौरसाचे क्षेत्रफळ किती चौरस सें.मी. असेल ?

(A) 42 (B) 96

(C) 112 (D) 144

**75.** $\frac{20}{23} + \frac{21}{23} + \frac{19}{23} + ? = 3$ तर ? च्या जागी कोणती संख्या येईल ?

(A) $\frac{2}{23}$ (B) $\frac{5}{20}$

(C) $\frac{7}{23}$ (D) $\frac{9}{23}$

**76.** सचिन ने एकदिवसीय क्रिकेटच्या 8 सामन्यात काही धावा केल्या. 9 व्या सामन्यात त्याने 62 धावा केल्या तेव्हा त्याची धावांची सरासरी 2 ने कमी झाली, तर त्याच्या 9 सामन्यातील सरासरी धावा किती ?

(A) 80 (B) 76

(C) 78 (D) 82

**77.** दोन विषयाच्या एका परीक्षेत 30% विद्यार्थी गणितात नापास झाले व 20% विद्यार्थी इंग्रजीत नापास झाले जर दोन्ही विषयात 10% विद्यार्थी नापास झाल्यास, दोन्ही विषयात शेकडा किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले ?

(A) 40% (B) 30%

(C) 70% (D) 60%

**78.** एका वस्तुला 2323 रुपयास विकल्यास 8% तोटा होतो. ती वस्तू किती रुपयास विकावी म्हणजे 8% नफा होईल ?

(A) 2626 (B) 2727

(C) 2525 (D) 2750

**79.** 75 नंतर ची 75 वी सम संख्या सांगा.

(A) 224 (B) 220

(C) 222 (D) 226

www.freshersnow.com

FRESHERS NOW



**80.** 6343* या संख्येस 6 ने नि:शेष भाग जातो तर * च्या जागी कोणता अंक येईल ?

(A) 4 (B) 8

(C) 6 (D) 1

**81.** दोन संख्या 3 : 4 प्रमाणात असून त्यांचा मसावि 4 असल्यास त्या संख्या कोणत्या व त्यांचा लसावि कोणता ?

(A) संख्या 8, 36 लसावि 84

(B) संख्या 4, 12 लसावि 40

(C) संख्या 12, 16 लसावि 48

(D) यापैकी नाही

**82.** $\frac{5^{-3(m-4)}}{5^8} = 1$ तर m = ?

(A) $\frac{4}{3}$ (B) $\frac{7}{3}$

(C) $\frac{8}{3}$ (D) $\frac{12}{11}$

**83.** $0.06 \times m = 36$ तर m = ?

(A) 6 (B) 6000

(C) 60 (D) 600

**84.** वडील व मुलगा मिळून एक काम 20 दिवसात करतात. वडील एकट्याने ते काम 30 दिवसात करतात तर मुलगा एकट्याने ते काम किती दिवसात संपवेल ?

(A) 120 (B) 60

(C) 40 (D) 45

**85.** जर एका क्रिकेटपटू च्या 3 डावातील धावा अनुक्रमे 102, 14, 56 आहे, तर त्याने चौथ्या डावात किती धावा कराव्यात म्हणजे त्याच्या 4 डावांची सरासरी 47.5 धावा होईल ?

(A) 18 (B) 24

(C) 20 (D) 16

**86.** एक रेल्वे ताशी 40 कि.मी. प्रती तास वेगाने धावते, तर ती रेल्वे 1560 मीटरचे अंतर किती सेकंदात कापेल ?

(A) 152.6 (B) 136

(C) 140.4 (D) 160

**87.** 260 चे 0.4% = ?

(A) 10.40 (B) 1.040

(C) 0.1040 (D) 1.2

**88.** शिरीषने 9200 ला खरेदी केलेला टि.व्ही. 11500 ला विकला, तर शेकडा नफा किती ?

(A) 32% (B) 28%

(C) 30% (D) 25%

**89.** तीन संख्याचे गुणोत्तर 8 : 3 : 4 आहे व त्या सर्व संख्यांची बेरीज 195 आहे, तर सर्वात लहान संख्येचा वर्ग किती ?

(A) 2704 (B) 1521

(C) 1600 (D) 14400

**90.** 5 आंबे 125 ला मिळतात तर 9 आंबे कितीला मिळतील ?

(A) 230 (B) 228

(C) 226 (D) 225

www.freshersnow.com

**91.** 5 वर्षांनंतर दिनेश व बालाजी यांच्या वयांचे गुणोत्तर 4 : 5 होईल. आज त्यांच्या वयाची बेरीज 44 आहे, तर बालाजीचे आजचे वय काढा.

(A) 25 (B) 30

(C) 28 (D) 32

**92.** द.सा.द.शे. 8% दराने 5000 रुपयांचे 1600 रुपये सरळ व्याज येण्यासाठी जितकी वर्षे लागतील तितक्या वर्षात 3000 रुपयांचे 10% दराने किती व्याज येईल ?

(A) 2000 (B) 1600

(C) 1200 (D) 1400

**93.** $\frac{\sqrt{36}}{\sqrt{49}} + \frac{\sqrt{9}}{\sqrt{49}} + \frac{\sqrt{25}}{\sqrt{49}} = ?$

(A) 4 (B) 2

(C) 8 (D) 6

**94.** 6561 च्या वर्गमुळाच्या वर्गमुळातून 625 च्या वर्गमुळचे वर्गमूळ कमी केल्यास कोणत्या संख्येचे वर्गमूळ शिल्लक राहते ?

(A) 16 (B) 36

(C) 20 (D) 25

**95.** एका दूरचित्रवाणी संचाची किंमत 20000 रु. असून तो 18500 रुपयात विकला तर शेकडा किती सूट दिली ?

(A) 10% (B) 12.5%

(C) 15% (D) 7.5%

**96.** $\frac{m^2+18}{9} = 3$ तर $m = ?$

(A) 3 (B) 4

(C) 5 (D) 6

**97.** एका वर्तुळाचा परीघ 176 सें.मी. असेल तर त्याचे क्षेत्रफळ किती सें.मी$^2$. ?

(A) 2468 (B) 1264

(C) 2464 (D) 3264

**98.** एका आयाताची लांबी ही रुंदीच्या दुप्पट असून त्याची परिमिती 1020 सें.मी. आहे तर आयाताचे क्षेत्रफळ किती सें.मी$^2$. ?

(A) 57800 (B) 28900

(C) 115600 (D) 408000

**99.** रामरावांनी एक गाय, एक म्हैस व एक बैल एकूण रुपये 85000 ला खरेदी केले. गाय, म्हैस व बैल यांच्या किंमतीचे प्रमाण 4 : 8 : 5 असेल, तर बैलाची किंमत किती ?

(A) रुपये 20000 (B) रुपये 45000

(C) रुपये 30000 (D) रुपये 25000

**100.** CAT = 24, DOG = 26 तर RAT = ?

(A) 39 (B) 42

(C) 36 (D) 37

- o O o -

www.freshersnow.com

FRESHERS NOW

MASTER COPY

## IMPORTANT INSTRUCTIONS : / महत्त्वाच्या सूचना :

**Read Carefully / काळजीपूर्वक वाचा**

1. Do not break the Question Booklet seal until told to do so.
तुम्हाला सांगितल्याशिवाय प्रश्नपुस्तिकेचे सील तोडू नका.

2. For writing or marking answer, use a **BLUE/BLACK** ball point pen ONLY, which you were asked to bring with you.
लिहिण्यासाठी किंवा उत्तर चिन्हित करण्यासाठी, फक्त **निळे/काळे** बॉल पॉइंट पेनच वापरले पाहिजे, जे तुम्हाला तुमच्यासोबत आणावयाचे आहेत.

3. Mark all your answers on the OMR Answer Sheet only. Only the OMR Answer Sheet will be evaluated.
तुमची सर्व उत्तरे ओएमआर उत्तरपत्रिकेवरच चिन्हित करा. फक्त ओएमआर उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन केले जाईल.


4. Mark only one answer for each question.
प्रत्येक प्रश्नासाठी फक्त एका उत्तरावर खूण करा.

5. Make sure that answer mark completely fills the correct circle.
उत्तराची खूण संपूर्ण वर्तुळ भरेल याची खात्री करा.

**Correct way to mark your answers**


**तुमच्या उत्तरांवर खूण करायची अचूक पद्धत**

Correct/बरोबर



Does not mark like this / याप्रमाणे खूण करू नका

Wrong / चुकीचे



www.freshersnow.com

### CAUTION!! / खबरदारी!!

*If you do not follow the above instructions, your Answer Sheet cannot be evaluated by the electronic scoring machine (Optical Marker Reader), and it will reject it.*

*तुम्ही वरील सूचनांचे पालन न केल्यास, तुमच्या उत्तरपत्रिकेचे इलेक्ट्रॉनिक स्कोरिंग मशीन द्वारे (ऑप्टिकल मार्कर रीडर) मुल्यांकन होऊ शकणार नाही, आणि ते रद्द ठरेल.*